# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०६/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील पटेल नगर पिपरी कन्हान येथे दिनांक ०५/०६/२०२२ चे २०.०० वा. ते दिनांक ०६/०६/२०२२ चे २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सतीश दुधनगर तिवारी वय ४५ वर्ष रा. पटेल नगर, कन्हान यांनी आपले किराणा दुकाण बंद केले व कुलुप लावले. ते दररोज प्रमाणे सकाळी ०५.०० वा. आपले दुकाण उघडण्याकरीता गेले असता दुकानाचे शटर हे बाहेर निघालेले दिसले व दोन्ही कुलुप वाकवलेले दिसले. फियादीने दुकाण उघडुन दुकाणाचे आत जावून काउंन्टर उघडुन बघीतले असता त्यात ठेवलेले चिल्लर ५,०००/— रु. व एका ग्राहका कडुन उधारी मिळालेले १५,०००/— रु. असे एकुण २०,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री सुरजुसे ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत इंदर कॉलरी खदान क्र. ३ कन्हान येथे दिनांक ०३/०६/२०२२ चे २२.०० वा. चे २२.३० वा. सुमारास आरोपीतांनी संगणमत करुन वराडा शिवाराकडे भाटीया कोलवाशरी कडे कोळसा साठवुन ठेवला आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन १४५५० किलो कोळसा कि. ५८,२४०/—रु. चा आरोपी क्र. १) उमेश पानतावने रा. कांद्री २) मिथुन नाडार रा. कांद्री ३) विक्की यादव रा. कन्हान ४) फारुख शेख कन्हान यांनी साठवुन ठेवला आहे असे आजु—बाजुच्या लोकांनी सांगितले त्यावरून गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रविकांन्त रामदास कन्डे वय ४९ वर्ष रा. कन्हान यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री सुरजुसे ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :–** अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे सुमारास **सुमीत राजकुमार चौरे (मृतक) वय ३२ वर्ष रा.पिपरी चुन्नी रिधोरा** हा दारू पिण्याच्या सवयीचा असुन नेहमी दारू पित होता. दि. ०६/०६/२०२२ रोजी १७.०० वा पुर्वी विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे सुमीत चौरे हा मृत अवस्थेत मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिनेश दिलीप मेश्राम वय २२ वर्ष रा. श्याम नगर पारडी, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ प्रमोद बंसोड मो.नं. ९६७३६०८६४२ हे करीत आहे.

## जातीविषयक शिवीगाळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा**:– अंतर्गत १५ कि. मी अंतरावरील मौजा कुंभापूर शिवार येथे दिनांक ०६/०६/२०२२ चे ११:०० वा. दरम्यान फिर्यादी महिला वय ५० वर्षीय हीचे पतीची वडीलोपार्जित पाच एकर शेती मौजा कुंभापूर शिवारात असुन त्या शेतीच्या धुऱ्याला लागुन आरोपी नाम– धनराज डांगरे, रा. वैशाली नगर नागपूर याची शेती आहे. फिर्यादी व आरोपी यांचे मध्ये शेतात जाणे येणाच्या रस्त्यामुळे एसडीएम मौदा येथे केस सुरू आहे. फिर्यादी ही आपल्या शेतावर पपई च्या पिकाला पाणी देत असता आरोपी हा फिर्यादीचे शेतात नाली करीत असता 'तुम्ही आपले शेतात नाली करा ही जागा आमची आहे' असे फिर्यादीने म्हटले असता आरोपीने फिर्यादीस जाती वाचक शिवीगाळ करून अपमान केला.तसेच आरोपीने फिर्यादीला ढकल–ढुकल केले व फिर्यादीला पट्टी बांधलेल्या ठिकाणी काठीने मारले व 'तु तुझ्या मुलाला बोलाव मी त्याला इथेच मारीन' असे म्हणुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भा.द.वि. सहकलम ३(१) आर, ३(२)व्हीए अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. मुख्तार बागवान उपविभागीय पोलिस अधिकारी कामठी विभाग मो.क्र. ९०८२५०७०७५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**